बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि १८ एप्रिल २०२४**

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २४७/२०२४ भादवि ३२६,३२३,५०४,५०६ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १७/०४/२०२४ रोजी १५.३० वा चे सुमारास, बाळे कॉर्नर ब्रिज खाली, रिक्षा स्टॉप जवळ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०४/२०२४ रोजी १९.३० वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | ज्ञानेश्वर सर्जेराव माळी, वय- २६ वर्षे, रा. मु.पो. श्रीपाद पिंपरी, ता. बार्शी, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) उमेश सुतार, २) प्रशांत सुतार, ३) ज्ञानेश्वर सुतार, ४) नागनाथ पालके, सर्व रा. मु.पो. उळे कासेगाव, ता. द. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादीस महिला तक्रार निवारण केंद्र सोलापूर ग्रामीण येथे बोलाविले वरुन फिर्यादी, फिर्यादीची आई व फिर्यादीची प्रेमिका- ऐश्वर्या असे फिर्यादीचा टेम्पो क्रं. एम एच ४५ टी ३८१९ यामधुन अधिक्षक कार्यालय येथे येत असताना बाळे कॉर्नर ब्रिज या ठिकाणी आले असता व पत्ता विचारत असताना प्रेमिका ऐश्वर्या हिचा दिर आरोपीत क्रं. १ याने लाकडाने फिर्यादीचे पाठीमागुन डोक्यात मारल्याने रक्त येवू लागले व आरोपीत क्रं. २,३ व ४ यांनी हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच आरोपीत क्रं. ३ याने आरोपीत क्रं. १ याचे हातातुन लाकडी बांबु घेवून फिर्यादीचे उजवे हातावर मारला त्यावेळी फिर्यादी खाली पडले. सदर प्रकार पाहुन फिर्यादीची आई व ऐश्वर्या हे भांडण सोडवली व तेथे लोकांची गर्दी जमली असता, नमुद आरोपीत मोटार सायकलवरुन पळुन गेले त्यानंतर आई व ऐश्वर्या यांनी फिर्यादीस सिव्हिल हॉस्पीटल येथे उपचारास दाखल केले असता व हाताचे एक्स रे काढला असता फ्रॅक्चर असल्याचे सांगितले. तसेच सदर भांडणात फिर्यादीचा विवो मोबाईल कोठेतरी पडुन गहाळ झाला आहे म्हणून. तपास:- सपोनि- बारावकर- ९४०३६९६३४२ |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १८१/२०२४ भादवि ३२४,५०४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १७/०४/२०२४ रोजी १०.०० वा चे सुमारास, जिल्हा उदयोग केंद्र, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १७/०४/२०२४ रोजी १९.३६ वा |
| **फिर्यादीचे नाव** | : | द्रोपदी परमेश्वर वाघमारे, वय- ४२ वर्षे, रा. तक्षशिला नगर, कुमठा नाका, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | कालीदास जेटीथोर, रा. तक्षशिला नगर, कुमठा नाका, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीचे ओळखीचा आरोपीत मजकुर हा फिर्यादी समोर येवून तु माझेशी का बोलत नाही असे म्हणून शिवीगाळ करुन तेथेच पडलेला दगड उचलुन फिर्यादीचे डोक्यात मारुन जखमी केले आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ११९५ बर्हिजे- ८३७८९८०९८७ |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | २०८/२०२४ भादवि ३२४,५०४,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. १७/०४/२०२४ रोजी १६.३० वा चे सुमारास, मुकुंद नगर, भवानी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि १७/०४/२०२४ रोजी १९.५३ वा |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | स्वप्नील राजु गवळी, वय- २६ वर्षे, रा. राजिव गांधी नगर, मुकुंद नगर, भवानी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) पियुष बाळासाहेब नागटिळक, २) संतोषी बाळासाहेब नागटिळक, ३) सुदाराबाई बजरंग नागटिळक, सर्व रा. मुकुंद नगर, भवानी पेठ, सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे जावेदा किराणा दुकानासमोर फिर्यादीचे मित्र संजय कांबळे, बाळु निकंबे यांचे सोबत फिर्यादी बोलत थांबले असता, तेथे आरोपीत क्रं. १ हा फिर्यादी जवळ आला व त्याने फिर्यादीकडे मावा आहे का दे असे म्हणाला त्यावेळी फिर्यादी त्यास माझ्याकडे मावा नाही असे म्हणाले असता, सदर कारणावरुन वरील आरोपीत मजकुर यांनी मिळुन फिर्यादीस शिवीगाळ करुन आरोपीत क्रं. २ हिने फिर्यादीची गच्ची पकडली व आरोपीत क्रं. ३ हिने फिर्यादीचे केस पकडुन तसेच आरोपीत क्रं. १ याने त्याचे घरात जावून चाकु आणुन फिर्यादीस मागुन चाकुने खांदयावर मारुन जखमी केले आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ ५५७ गायकवाड |